दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २३५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.२५ नोव्हेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## मराठी गाणी न लावल्यामुळे मनसे कार्यकर्त्यांची हॉटेल व्यवस्थापकाला मारहाण

**दै.रायगड नगरी । मुंबई**

हॉटेलमध्ये मराठी गाणी न लावल्यामुळे मनसे कार्यकर्त्यांनी हॉटेल व्यवस्थापकाला बेदम चोप दिला आहे. नवी मुंबईतील वाशीमध्ये ही घटना घडली आहे. याचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.

वाशीमध्ये मनसे कार्यकर्त्यांकडून हॉटेल व्यवस्थापकाला मारहाण चोप देण्यात आला आहे. नवी मुंबईतील वाशी येथील सतरा प्लाझा मधील द टेस्ट ाफ पंजाब हॉटेल व्यवस्थापकाला मनसे कार्यकर्त्यांनी मारहाण केली आहे. हॉटेलमध्ये मराठी गाणी लावा, अशी मागणी करूनही याकडे व्यवस्थापकाने दुर्लक्ष केले. वारंवार सांगितल्यानंतरही हॉटेल व्यवस्थापकाने मराठी गाणी लावली नाहीत. याबाबत मनसे पदाधिकारी यांनी विचारणा केली असता हॉलेट व्यवस्थापकाकडून उडवाउडवीची उत्तर देण्यात आली. त्यामुळे संतापलेल्या मनसेतील वाशी पदाधिकार्यांकडून हॉटेल व्यवस्थापकाला मारहाण करण्यात आली. मनसेच्या कार्यकर्त्यांनी मारहाण केल्यानंतर हॉटेल मालकांने याबाबत दिलगिरीचे पत्र पोस्ट करण्यात आले आहे.

# गोवर-रुबेला विषयी पनवेल महापालिका ॲक्शन मोडवर

## लसीकरण व जनजागृतीकरणावर भर देण्याच्या आयुक्तांच्या सूचना

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**महापालिका क्षेत्रातून येत असलेल्या गोवर रूबेला रूग्णांची संख्या लक्षात घेऊन महापालिका मुख्यालयात आज(२४ नोव्हेंबर) आयुक्त श्री.गणेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली महापालिका कार्यक्षेत्रातील बालरोग तज्ज्ञ, स्त्रीरोग तज्ज्ञ यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीची बैठक घेण्यात आली. यावेळी नागरिकांनी घाबरून जाऊ नये, गोवरचे रूग्ण मिळालेल्या परिसराचा सर्वे करणे, तसेच जनजागृती व लसीकरणावरती भर देण्याच्या सूचना आयुक्तांनी वैद्यकिय अधिकाऱ्यांना दिल्या.**



यावेळी उपायुक्त सचिन पवार, प्रभारी मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. रेहाना मुजावर जागतिक आरोग्य संघटनेचे विशेष समन्वयक अरूण काटकर, डॉ. अभय सेठी, डॉ. जॉय भांडारकर, डॉ. राहूल पेद्दावाड, डॉ. किंतीक करे, डॉ. मंदार बद्रापूरकर, डॉ.विवेक गुप्ता, डॉ. स्वाती लिकीते, डॉ. तुषार जाधव, डॉ. विनय कमले, डॉ. प्रशांत गायकवाड, लसीकरण क्षेत्र सहनियंत्रक मोहन मुकादम, महापलिकेच्या सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी तसेच एएनएम, जीएनम, आशा वर्कर उपस्थित होत्या.

आत्तापर्यंत महापालिका क्षेत्रात ५ रूग्ण आढळले असून १३ रूग्ण संशयित आहेत. यांच्या रक्तांचे नमुने तपासणीस पाठविले आहेत. गोवर रोग हा संसर्गजन्य रोग असला तरी ज्यांनी याचे डोस घेतले आहेत, त्यांच्यामध्ये याची तीव्रता कमी दिसते. त्यामुळे अजूनही ज्या मुलांचे गोवरचे डोस राहीले आहेत त्यांच्या पालकांनी आपल्या जवळच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात घेऊन जावे. दर बुधवारी याठिकाणी गोवरची लस दिली जाते. याशिवाय आपल्या कार्यक्षेत्रात ३०० ठिकाणी बाह्यलसीकरण सत्रे घेतली जातात. या लसीकरण सत्रांमध्ये देखील गोवरचा डोस दिला जातो.

**घरामध्ये एखादा गोवर रूग्ण आल्यास त्यास सात दिवस आयसोलेशनमध्ये ठेवावे जेणे करून याचे इन्फेक्शन दुसऱ्यांना होणार नाही याची नागरिकांनी काळजी घेणे गरजेचे आहे. गरज भासल्यास त्या त्या परिसरातील बालरोग तज्ज्ञाची मदत घेण्याविषयी वैद्यकिय अधिकाऱ्यांना यावेळी सूचित करण्यात आले. तसेच गोवरसाठी महापालिकेच्या वतीने खास एक रूग्णवाहिका राखीव ठेवण्यात आली आहे. महापालिका क्षेत्रातील गंभीर गोवरचे रूग्ण आढळल्यास त्यांनी मोफत रूग्णवाहिकेसाठी महापालिकेशी संपर्क करा.**

**गणेश देशमुख-आयुक्त, पनवेल महानगरपालिका**

## राज्यपालांना हटवा, अन्यथा पुढच्या ४ दिवसांत इंगा दाखविणार : उद्धव ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे प्रमुख आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. 'जर या राज्यपालांना हटवलं गेलं नाही तर पक्षभेद बाजूला ठेवून आपण सर्व महाराष्ट्रप्रेमी नागरिकांनी एकत्र येऊन विरोध केला पाहिजे. त्यामुळे मी सर्व नागरिकांना आवाहन करत आहे की, आपण जर शांत बसलो तर आपल्या शूर-वीर म्हणवल्या जाणाऱ्या राज्याच्या अब्रुची लक्तरे या लोकांकडून वेशीवर टांगली जातील. त्यामुळे येते दोन-चार दिवस आपण वाट पाहू आणि राज्यपालांना हटवलं नाही तर या महाराष्ट्रद्रोह्यांना एक खणखणीत इंगा दाखवलाच



पाहिजे. मग त्यासाठी महाराष्ट्र बंद करायचा की मोर्चा काढायचा हे आपण ठरवू,' असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

'महाराष्ट्र छत्रपती शिवरायांना मानतो. मात्र त्यांचा अपमान झाल्यावर भाजपच्या लोकांकडून गुळमुळीत प्रतिक्रिया दिल्या जात आहेत. केंद्रात ज्यांचं सरकार

.../२


## श्रीवर्धनचे डायलिसिस सेंटर अधांतरीच!

### माणगाव येथील एकाच केंद्रावर २२ जण वेटिंगला, प्रशासनाचे मात्र दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । दिघी**

उच्च रक्तदाब, मधुमेह आदींमुळे होणाऱ्या मूत्रपिंड विकारांची रुग्ण संख्या जिल्ह्यातील ग्रामीण भागात वाढली आहे. या आजाराचे वाढते प्रमाण बघता उपचार म्हणून डायलिसिस सुविधा रायगड मधील उपजिल्हा रुग्णालयांमध्ये चार नवीन डायलिसिस केंद्र सुरु करण्यात येणार असल्याची घोषणा जोरदार झाली. मात्र, ही घोषणा हवेतच विरल्याने श्रीवर्धन, म्हसळा तालुक्यातील रुग्णांचे प्रचंड हाल होत असून उपचाराविना जीव धोक्यात आला आहे.

किडनी निकामी झाल्याने शरीरातील रक्त शुद्धीकरण प्रक्रिया बंद होते. त्यामुळे यावर उपचार म्हणून रुग्णांना किडनी बदलने किंवा डायलिसिसद्वारे रक्तशुद्धीकरण करणे आवश्यक असते. किडनी बदलण्यासाठी एकाच वेळी बराच खर्च लागत असल्याने अनेक रुग्ण डायलिसिसचा पर्याय निवडतात. त्यासाठी जिल्ह्यातील रुग्णांना उपचारासाठी आवश्यक



असलेल्या डायलिसिस सुविधेसाठी रायगड मधील उपजिल्हा रुग्णालयांमध्ये चार नवीन डायलिसिस केंद्र सुरु करण्यात येणार असल्याची घोषणा झाली. मात्र, त्यापैकी श्रीवर्धन आणि रोहा येथे केंद्र सुरू न झाल्याने डायलिसिस रुग्णांची चांगलीच परवड होत आहे.

रायगड जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन, रोहा, पेण तसेच कर्जत याठिकाणी महाविकास आघाडीचे सरकार असताना पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या माध्यमातून प्रत्येकी एक केंद्र आणि त्याठिकाणी प्रत्येकी दोन डायलसिस मशिन व आरओ प्लँट बसविण्यात येणार होते. मात्र, माणगाव व पेण येथे केंद्र सुरू झाली पण रोहा व श्रीवर्धन तालुक्यातील रुग्णांना रुग्णालयात जाण्यासाठी प्रवासाची दगदग आणि अधिकची पदरमोड करत रुग्णालयात पोहोचल्यावर आधीच्याच रुग्णांची प्रतीक्षायादी मोठी असल्याने नंबर कधी लागणार, अशी स्थिती आहे. प्रतीक्षायादीमुळे अनेक नव्या रुग्णांना डायलिसिसचा लाभ घेता येत नसल्याने दिवसेंदिवस याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर होत असतो.

मूत्रपिंड विकाराची श्रीवर्धन व म्हसळ्यात रुग्ण आहेत. मात्र, सोय नसल्याने खाजगी रुग्णालयात डायलिसिस करावे लागत आहे.

.../२




## ऐरोलीतील मराठी भाषा भवन उपकेंद्राच्या जागेची उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली पाहणी



**दै.रायगड नगरी । ठाणे**

राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज नवी मुंबईतील ऐरोली येथील प्रस्तावित मराठी भाषा भवन उपकेंद्राच्या भूखंडाची पाहणी केली व येत्या पंधरा दिवसात काम सुरू करण्याचे निर्देश दिले.

ऐरोलीतील भूखंड क्र. ६ अ येथे मराठी भाषा भवन उपकेंद्राची उभारणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून करण्यात येणार आहे. या जागेची आज श्री. सामंत यांनी पाहणी केली. यावेळी मराठी भाषा विभागाचे सहसचिव मिलिंद गवादे, औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य अभियंता श्री. तुपे यांच्यासह शालेय शिक्षण विभाग, उद्योग विभाग व मराठी भाषा विभागाचे अधिकारी उपस्थित होते. श्री. सामंत म्हणाले की, ऐरोलीच्या या भूखंडावर मराठी भाषा भवनच्या उपकेंद्र उभारणीचे काम तातडीने सुरू करण्याचे निर्देश संबंधितांना देण्यात आले आहेत. या उपकेंद्रात मराठी भाषा संदर्भातील महामंडळे, इतर कार्यालये असणार आहेत. हे भवन उभारण्यासाठी महापालिकेच्या मंजुरीसंदर्भात संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत. यावेळी श्री. सामंत यांनी प्रस्तावित भवनाच्या आराखड्याची माहिती घेतली. लवकरच भूमीपूजन करून काम सुरू करण्यासंदर्भातील तयारीचा आढावा घेतला.

### पनवेल प्रवासी संघाच्या लढ्यास अंशत: यश

## पनवेल एस टी स्थानकातील पायाभूत सुविधांची कामे १५ दिवसात सुरू होणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल एसटी स्थानकातील प्रवासी नागरिकांना भेडसावणाऱ्या असुविधांचा धांडोळा घेण्याच्या उद्देशाने उपमहाप्रबंधक विद्या भिलारकर यांनी बुधवार दिनांक २३ नोव्हेंबर रोजी स्थानकाचा दौरा केला. पायाभूत सुविधांची वानवा पाहता आगामी पंधरा दिवसात सारी कामे सुरू झाली पाहिजेत असे त्यांनी सदरचा प्रकल्प विकसित करणाऱ्या मेसर्स पनवेल मास ट्रान्झिट प्रोजेक्ट लिमिटेड कंपनीच्या पदाधिकाऱ्यांना ठणकावले.

पनवेलच्या राज्य परिवहन मंडळाच्या स्थानकातील पुनर्बांधणीचा प्रकल्प तब्बल १४ वर्षे उलटून गेल्यानंतरही प्रत्यक्ष कामास सुरुवात होत नसल्याचे पाहून पनवेल प्रवसी संघाने आंदोलनाचे संविधानिक हत्यार उपसले. या आंदोलनाचे फलित म्हणून नोव्हेंबर महिन्यातील दुसऱ्या आठवड्याच्या अंती महामंडळाच्या उपमहाप्रबंधक (बांधकाम) यांच्यासमवेत पनवेल प्रवासी संघाचे शिष्टमंडळ आणि विकसकाचे पदाधिकारी यांच्या दरम्यान बैठक संपन्न झाली. पुनर्बांधणी प्रकल्प अद्यापही अनुमत्यांच्या जंजाळात फसला असल्याचे या बैठकीत निष्पन्न झाले. परंतु तोपर्यंत नागरिकांना किमान सुविधा मिळाल्या पाहिजेत यासाठी पनवेल प्रवासी संघाने आग्रही भूमिका घेतली. सदरच्या बैठकीत ठरल्या प्रमाणे पनवेल एसटी स्थानकाचा विद्या भिलारकर यांनी पाहाणी दौरा केला होता.

यामध्ये आवाराच्या आतील साऱ्या रस्त्यांची डागडुजी करून आवार खड्डे मुक्त ठेवणे, जेथे निवारा शेड नाहीत तिथे त्या बांधणे, आगारातील अस्ताव्यस्त वाढलेली झाडी झुडपे यांची छटाई करून हा परिसर स्वच्छ ठेवणे, दोन शौचालयांची तातडीने स्वच्छता करून ती सातत्याने स्वच्छ ठेवणे. बस गाड्यांचे मार्ग आणि वेळापत्रक यांचा माहिती फलक आवारात दर्शनी भागात लावणे अशी महत्वाची कामे आगामी १५ दिवसांत सुरू होणार आहेत. विद्या भिलारकर यांनी केलेल्या पाहाणी दौऱ्याचे वेळी त्यांच्या समवेत विभागीय अभियंता विजय सावंत, पनवेल प्रवासी संघाचे संस्थापक अध्यक्ष डॉक्टर भक्ती कुमार दवे, सचिव श्रीकांत बापट, सदस्य रमेश जानोरकर, निलेश जोशी, गौतम अगरवाल आदी मान्यवरांच्या समवेत संबंधित एस टी कर्मचारी उपस्थित होते.









श्रद्धा हत्याकांड मधील प्रमुख आरोपी आफताब पूनावाला याची केस फास्ट ट्रॅकवर घेऊन त्वरित फाशीची मागणी व निषेध भाजप प्रदेश कार्यालय मुंबई येथे करताना अल्पसंख्यांक मोर्चाचे मुंबई अध्यक्ष वसीम खान, अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर, पदाधिकारी, कार्यकर्ते,मुस्लिम व शीख बांधव

# गिरणे येथील ग्रामसेवकाविरुद्ध गटविकास अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार


**दै.रायगड नगरी । तळा**

गीरणे, भानंग दोन ग्रामपंचायतसाठी नियुक्त ग्रामसेवका वीरोधात ग्रामस्थांनी कारवाई करण्याची मागणी तळा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

तळा तालुक्यात गिरणे, मालाठे नानवली या गावांसाठी खंडू काळे यांच्या विरोधात लेखी तक्रार गटविकास अधिकारी कुलदीप बोंगे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. गिरणे ग्रामस्थांनी यासंदर्भात निवेदन दिले आहे.

अरेरावीची भाषा, उध्दट वर्तन असा ठपका ग्रामसेवकावर ठेवण्यात आल्याचे निवेदनात नमूद केले असल्याचे बोलले जात आहे.या पत्राची त्वरित दखल घेत गटविकास अधिकारी श्री.बोंगे यांनी ग्रामसेवक खंडू काळे यांचा गिरणे ग्रामपंचायतीचा चार्ज काढून घेतला असून या ठिकाणी या ग्रामपंचायतीचा संपूर्ण कार्यभार राजेंद्र काशिनाथ दवटे या ग्रामसेवकांना पुढील आदेश होईपर्यत देण्यात आला आहे. श्री.दवटे यांच्याकडे पढवण, मेढे या ग्रामपंचायतीचा कार्यभार असून त्यांच्याकडे गिरणे ग्रामपंचायतीचा कार्यभार सोपविण्यात आला असल्याने ते किती वेळ या ग्रामपंचायतीस देतात हे पुढील कालावधी मध्ये कळेल. तूर्तास ग्रामस्थांच्या मागणी नुसार काळे यांना गिरणे ग्रामपंचायतीतून हटविण्यात आले आहे.

# प्रशासनाच्या सर्तकतेमुळे टॅंकरच्या केबिनला लागलेली आग आटोक्यात



**दै.रायगड नगरी । खोपोली**

मुंबई पुणे एक्सप्रेस वे आणि अप–घात समानार्थी शब्द झाले आहेत. दररोज या महामार्गांवर अपघाताची श्रृखंला सुरूच आहे. आजही सायंकाळच्या सुमारास मुंबई–पुणे एक्सप्रेस वे महामार्गांवर एचओसी ब्रिज मॅजिक पॉईंटजवळ (अंडा पॉईंट जवळ) एका टॅंकरच्या केबीनला अचानक आग लागली. दरम्यान, प्रशासनाच्या सर्तकतेमुळे टॅंकरच्या केबिनला लागलेली आग आटोक्यात यश आले.

याबाबत सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, मुंबई–पुणे एक्सप्रेस वे महामार्गांवर एचओसी ब्रिज मॅजिक पॉईंटजवळ (अंडा पॉईंट जवळ) टॅंकर (क्रमांक एमएच १२ एलटी ५३०७) च्या केबीनला अचानक आग लागल्याची माहिती मिळाल्यावर खोपोली पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक हरिश काळसेकर, पोलीस उपनिरिक्षक सुधाकर लहाने, बोरघाट पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक महेश चव्हाण, आयआरबी पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणा, बोरघाट वाहतूक पोलीस, खोपोली पोलीस, डेल्टा फोर्स आणि अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेच्या सदस्यांनी या अपघातात मोलाचे मार्गदर्शन केल्याने टॅंकरच्या केबिनला लागलेली आग आटोक्यात येण्यास मदत झाली. वेळीच योग्य ती कारवाई करण्यात आल्याने टॅंकरचा बहुतेक भाग सुरक्षित राहिल्याने मोठी हानी टळली. दरम्यान, आयआरबी यंत्रणेने सदर टॅंकर क्रेनच्या सहाय्याने घटना स्थळावरून सुरक्षित ठिकाणी बाहेर काढला आहे.

# संदीप घरत यांनी दिले घोणस जातीच्या सापाला जिवदान

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड मधील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या मुरुड आगारासमोरील प्रियदर्शनी को.ऑप.सोसायटी परीसरात मांजरीने खिळवून ठेवलेल्या घोणस जातीच्या दोन फुटी सापाला सर्पमित्र संदीप घरत यांनी आपल्या कौशल्याने पकडून वनविभागाच्या सहकार्याने जवळील जंगलात सुरक्षितपणे सोडून दिल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

# स्टील मार्केटमध्ये सुविधांसाठी आंदोलन; रामदास शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलक बाजार समितीला घेरणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आशिया खंडातील क्रमांक एक चे कळंबोली स्टील मार्केट समस्यांच्या गर्तेत अडकले आहे. या विरोधात बाळासाहेबांच्या शिवसेनेने शुक्रवारी २५ नोव्हेंबर रोजी आंदोलन पुकारले आहे. या निमित्ताने एक दिवसीय लाक्षणिक बंदचे आवाहन पक्षाचे पनवेल जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांनी केले आहे. यामध्ये व्यापारी, वाहतूकदार, माथाडी कामगार तसेच इतर सर्वजण सहभागी होणार असल्याचे शेवाळे यांनी सांगितले.

कळंबोली स्टील मार्केटमध्ये सुविधांचा वाणवा आहे. रस्ते, पाणी, स्ट्रीट लाईट, पावसाळी गटारे याशिवाय धुळीचे साम्राज्य अशा अनेक समस्यांच्या चक्रव्यूहामध्ये मार्केट अडकले आहे. त्याचा त्रास व्यापारी, वाहतूकदार, माथाडी कामगार त्याचबरोबर इतर सर्वांना होत आहे. बाळासाहेबांच्या शिवसेनेच्या वतीने बाजार समितीला याबाबत २५ नोव्हेंबर चे अल्टिमेटम दिले होते.

परंतु त्यांच्याकडून कोणतेही उत्तर किंवा प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून बाजार समितीमधील मूलभूत सुविधांच्या न्याय हक्कासाठी गुरुवार दिनांक २५ नोव्हेंबर २०२२ रोजी आंदोलन करण्यात येणार आहे. या एक दिवसाच्या लाक्षणिक बंद आणि आंदोलनामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांनी केले आहे.

# सुकेळी येथे रंगणार कबड्डी सामन्यांचा थरार

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याजवळील सुकेळी (वेताळवाडी) येथे जय हनुमान क्रिडा मंडळ यांच्या वतीने कबड्डी सामन्यांचे आयोजन शनिवार दि.२६ ते रविवार दि.२७ नोव्हेंबर २०२२ दरम्यान करण्यात आले आहे. या सामन्यांचे उद्घाटन विधानपरिषदेचे आमदार अनिकेत भाई तटकरे यांच्या हस्ते होणार आहे. या सामन्यांत फक्त ठाकुर, कातकरी समाजातील संघ सहभागी होणार आहेत. प्रथम क्रमांक मिळविणा–या संघास रु. १०,००० व आकर्षक चषक तर द्वितीय क्रमांकास रु. ७,००० व चषक, तसेच तृतिय व चतुर्थ क्रंमाकास अनुक्रमे ४,००० व ३,००० तसेच आकर्षक चषक देण्यात येणार आहेत.

## जाहीर नोटीस

माझे अशिल श्री. सितेन्दरसिंग अमरसिंग संधु आणि श्री. तुकाराम सोमा सरक पत्ता : ऑफीस नं ७०१, निहारिका मिराज, सेक्टर १०, खारघर, नवी मुंबई– ४१०२१०, यांनी खाली वर्णन केलेल्या मिळकतीचा व्यवहार करण्याचे ठरवले आहे.

**–: मिळकतीचे वर्णन ;–**

**श्री अबरार सारफुद्दिन खान यांचा मालकीची जमिन**
**मौजे.धरणा कॅम्प, ता. पनवेल, जि. रायगड**

| गाव | गट नं | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| धरणा कॅम्प | १९ | ३५ | ०.१७.०० | २.२१ |

सबब वर नमूद जमिनीवर कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसबंध, कुळवहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकारार, फरोक्त, गहाण दान, बोजा, बक्षीस चार्ज लाज वैगरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाचे आत हक्क हितसबंध स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्या पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे.

वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वैगरे न आल्यास सदर जमिन निर्वेध व बोजरहीत असून त्यावर कोणताही प्रकारचा हरकत, तक्रार दावा, हितसंबंध नाही असे समजून आमचे सदर वर नमूद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारचा हरकती, तक्रारी दावे आमचे अशीलांवर बंधन कारक राहणार नाहीत याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक : २४/११ /२०२२

सही/–
**ॲड.राहुल ब. लोंढे**

Adv.Yash P. Bangar

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D) GODSE MADAM PANVEL, AT PANVEL

M.A.No.1707/2022
Exh : 7/D
N.D. 7/1/2023

1) Mr.Kashmir Singh Jagat Singh Paliya
Age : 64 Years, Occ. :
2) Mr.Gurdeep Singh Kashmir Singh Paliya
Age : 34 Years, Occ. :
3) Mrs.Gurmeet Kaur Kashmir Singh Paliya
Age : 33 Years, Occ. :
4) Ms.Gurjeet Kaur Kashmir Singh Paliya
Age : 32 Years, Occ. :
All R/at Flat No.604, Shree Samarpan
Plot No.135, Sector-19,
Kharghar, Raigad-410206 Applicants

That Late Mrs.Harjit Kaur Kashmir Singh Paliya was the wife of Applicant No.1 & Mother of Applicant Nos.2 to 4 who expired on 26/09/2022 at Kharghar. The Property Description Standing in The Name of Deceased Is Attached Herewith.

**SCHEDULE OF PROPERTY 'A'**

Name of the Property Holder : Late Mrs.Harjit Kaur Kashmir Singh Paliya & Mr.Kashmir Singh Jagat Singh Paliya (Jointly Owned)

Flat No.604, 6 th Floor, SHREE SAMARPAN CHS Ltd., Plot No.135, Sector-19, GES, Kharghar, Tal-Panvel & Dist-Raigad-410210, admeasuring area 630 Sq.ft. Carpet area (756 Sq. Ft. Built Area +50.00 Sq. Ft. Terrace Area.) Agreement Value Rs.32,00,000/- (Rupees Thirty Two Lakhs Only) (For 50% shre i.e., Rs.16,00,000/-)

Whereas the above-named applicants have filed present misc. application for heirship certificate under Bombay regulation VIII of 1827, the court of civil judge (S.D.) Panvel.

You the members of public are hereby given public notice to appear in the court of civil judge (S.D.) Panvel in person or by pleader duly instructed and to file your say / objection if any Public Notice within 30 days from the date of Publication of public notice, failing which the said application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under the hands and seal of the court this 23 Day of 11/2022

Sd/- Jr.Clerk Civil Court, Panvel | Court Seal | Sd/- Asst.Superident. Civil Court, Panvel

मा.सोनावणे सो.कोर्ट

प्रो.जमा.६–२५

अर्जदाराचे वकील
श्री.समीर राम कुंभार
वकील उच्च न्यायालय

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६५६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०५/०१/२०२३

१) श्री.रामदास कृष्णा सुरते
वय : वर्षे, धंदा : शेती
२) श्री.भरत कृष्णा सुरते
वय : वर्षे, धंदा : शेती
दोघेही रा.वाघिवली वाडा, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्रीमती.सुषमा वसंत परदेशी
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
रा.भिंगारी, पो.ओएनजीसी, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी कै.सिताबाई कृष्णा सुरते ह्या दि.०८/०२/२०१८ रोजी मौजे : वाघिवलीवाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावल्या असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : ओवळे (वाघिवली वाडा), ता.पनवेल,**
**जि.रायगड येथील युनिट केस नं.६३**

| भूमि संपादन निवाडा क्र. | एकूण संपादीत जमिनीचा तपशिल | | बांधकाम असल्याचा त्याचा तपशिल | | दि.१ मार्च २०१४ च्या उपरोक्त शासन निर्णया नुसार भूखंड वाटपास अनुज्ञेय क्षेत्र (चौ.मी.) | दि.१ मार्च २०१४ च्या उपरोक्त शासन निर्णया नुसार भूखंड वाटपास अनुज्ञेय क्षेत्र (चौ.मी.) | भूखंड वाटपाचा तपशिल | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | भूमापन क्र. | क्षेत्र (हे.आर.) | बांधकामाबद्दल पुनःस्थापनेसाठी वाटप करावयाचे क्षेत्र (चौ.मी.) | बांधकाम धारकाचे नाव | | | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ. मी.) |
| ओवळे ६३ | ११६/१० | ०–२६–६ | – | – | २,३६०.०० | ३७१.७० | ८ | ९१ | ८७० |
| | ११६/४ | ०–०४–५ | – | – | ४५०.०० | ७०.८८ | | | |
| | १२३/१० | ०–०५–१ | – | – | ५१०.०० | ८०.३३ | | | |
| | १२३/६ | ०–०२–८ | – | – | २८०.०० | ४४.१० | | | |
| | १२६/६ | ०–०६–८ | – | – | ६८०.०० | १०७.१० | | | |
| | ८०/३ | ०–१२–१ | – | – | १,२१०.०० | १९०.५८ | | | |

कै.सिताबाई कृष्णा सुरते यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२४/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

पृष्ठ क्र.१ वरुन...

# राज्यपालांना हटवा, अन्यथा पुढच्या ४ दिवसांत इंगा दाखविणार : उद्धव ठाकरे

असतं त्यांच्या विचारांची माणसं राज्यपाल म्हणून नेमली जातात. मात्र या माणसांची कुवत काय असते, या माणसांची पात्रता काय असते? ज्या माणसांना वृद्धाश्रमातही जागा मिळत नाही, त्यांना राज्यपाल म्हणून नेमलं जातं का? राज्यपाल नियुक्तीचेही निकष ठरवण्यात आले पाहिजेत. आपल्या राज्यपालांना राज्यपाल म्हणणंच मी सोडून दिलं आहे. राज्यपालपदाची झूल पांघरली म्हणून त्यांनी काहीही बोलावं, हे सहन केलं जाणार नाही. कोश्यारींनी याआधीही मराठी माणसांचा अपमान केला होता. या सडक्या मेंदूच्या मागील मेंदू कोण आहे, याचा शोध घेण्याची वेळ आली आहे,' असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी भगतसिंह कोश्यारी यांच्यासह केंद्र सरकारवर घणाघाती टीका केली आहे.

दरम्यान, राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना हटवा, या उद्धव ठाकरे यांनी केलेल्या मागणीला केंद्र सरकारकडून नेमका कसा प्रतिसाद दिला जातो आणि खरंच राज्यपालांकडून पदभार काढून घेतला जातो का, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# श्रीवर्धनचे डायलिसिस सेंटर अधांतरीच!

उपजिल्हा रुग्णालयात डायलिसिस हे मोफत होत असल्याने अनेक गरीब रुग्णांना त्याचा जगण्यासाठी फायदा होतो. मात्र खाजगी केंद्रात त्याची फी ही चौदाशे आहे. त्यामुळे सामान्य रुग्णांना आठवड्यातून तीनदा डायलिसिस करणे परवडत नाही. माणगाव उपजिल्हा रुग्णालयात डायलिसिस साठी ९ रुग्ण उपचार घेतात. तर तब्बल २२ जण अद्यापही आपला नंबर कधी येईल याची वाट पाहत खाजगी केंद्रांत डायलिसिस साठी जात आहेत. अधिक रुग्णांना सेवा देण्यासाठी माणगाव येथे दोन पाळीत तंत्रज्ञ ठेवण्याची तसेच श्रीवर्धन व रोहा येथे लवकरात लवकर डायलिसिस केंद्र व्हावे अशी मागणी होत आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ सुहास माने यांना संपर्क केलं असता बैठकीत असल्याचे सांगितले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## संक्षिप्त...

### सोमवंशी क्षत्रीय माळी समाजाचे वार्षिक स्नेहसंमेलन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरूडच्या सोमवंशीय क्षत्रीय माळी समाजाचे सन २०२१-२२ चे वार्षिक स्नेहसंमेलन भोगेश्वर आळीतील श्रीगावभैरव देवस्थानच्या प्रांगणांत कार्यक्रमाचे अध्यक्ष मनोहर गुरव संस्थापक अध्यक्ष महात्मा फुले तथा माजी समाज अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख अतिथि श्रीकांत कवळे नायब तहसिलदार, विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्या प्रमुख उपस्थित संपन्न झाले.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या समाज बंधु भगिनींचा सत्कार करण्यात आले. प्रमुख पाहुणे श्रीकांत कवळे यांच्या हस्ते ज्येष्ठ समाजसेवक गोपाळ दवटे व मनोहर गुरव यांचा त्यांच्या निस्पृह समाज कार्याबद्दल शाल व श्रीफळ व सन्मानचिन्ह देवून सन्मान करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समाज अध्यक्ष महेश कारभारी, उपाध्यक्ष अजित चोगले, सचिव केतन सुरेश वर्तक, सहसचिव धिरज भगत व कार्यकारी मंडळ, तसेच संकल्प युवांचे अध्यक्ष राहुल वर्तक आणि संकल्प युवांचे कार्यकर्ते यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी इयत्ता १० वी व १२ वी मध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते यथोचित सत्कार करून पारितोषिक देण्यात आले. तसेच समाज कार्यात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तिचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपिठावर समाज अध्यक्ष महेश कारभारी, समाज उपाध्यक्ष ड. अजित चोगले, समाज सचिव केतन वर्तक, समाज सहसचिव सुधीर भगत, अतंर्गत हिशोब तपासणीस उमेश भायदे, सह अंतर्गत हिशोब तपासणीस मा. आदेश दांडेकर, महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित चेअरमन अजित गुरव, श्रीगावभैरव देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष अविनाश दांडेकर, माजी नगराध्यक्ष तसेच समुह नृत्य स्पर्धेचे प्रायोजक मंगेश दांडेकर, माजी नगरसेवक तसेच समुह नृत्य स्पर्धेचे प्रायोजक प्रमोद भायदे, संकल्प युवा अभियानचे अध्यक्ष राहुल सुरेश वर्तक हे उपस्थित होते.

### PUBLIC NOTICE

Cancellation of execution power of MR.BHAVESH MANISH THAKKAR only execution with Sub-Registrar Mumbai on 08/03/2021 for only execution as Never Power Was Given For Selling, Never Power Was Given For Signatory, Never Power Was Given For Benefits, Claim, Lieu, Use, Execute Not Selling Of Properties Only Buying Power Was Given For Registration Of Immovable Properties In Mumbai, Navi Mumbai, Pune, Panvel, Thane, Goa, Alibag and/in and around the periphery of the district's, City and all over Maharashtra and Goa Was never given under BDR No 5-3059-2021. No Further Power Was Given and Now Cancelled/Revoked/Terminated Only Cancellation As Per Old Power and (l).Public notice dated 23/11/2022 Newspaper Named Vadalwara (2). Public notice dated 24/11/2022 Newspaper Named Raigad Nagari (3).Public notice dated 24/11/2022 Newspaper Named Vadalwara only no new words as the notary documents was made by Mr.Gul Atmaram Madnani Advocate High Court and he said that the Cancellation/Termination is only as per old power and no further power is given or new word added witness to be the notary agent name Usha.B.Bolinjkar Advocate & Notary. (Bond Rs.100 Stamp Paper Date: - 20 OCT 2022) On 17/11/2022) Is only a Cancellation/Termination only no further power given 2 Advocates & All Parties confirm as the assets are owned by MR.BHAVESH THAKKAR Cancellation/ Termination/Revoked (l).Shri.Devendrakumer Ramjag Shukla (Person Died).; (It Was Only A Execution Power Nothing More). Cancellation Confirmed By All Parties (2).Shri.Arun kumar Chaturvedi (3).Shri.kapil Tiwari now to have no power for anything but all the said people to be liable for thier past Acts & Activities if any. This Public Notice is given to inform all Sub-Registrar Offices and All Courts, Etc. If anykind of objection contact Mr.Bhavesh Thakkar Contact Details: - +919820636968.

मा.मुजावर साहेब कोर्ट

अ‍ॅड.सरिता रामधरणे-शहासने

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६५८/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.०३/०१/२०२३

१) श्रीमती.जोगीदेवी राजाराम चौधरी
उ.व.६१ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.रमेश राजाराम चौधरी
उ.व.३९ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.ए-६२/४, सिडको कॉलनी,
सेक्टर-१३, नवीन पनवेल, ता.पनवेल
३) श्री.मोतीलाल राजाराम चौधरी
उ.व.३८ वर्षे, धंदा : व्यवसाय
४) सौ.रेखा नेमाराम चौधरी
वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
क्र.१, ३ व ४, रा.ए-८६-५,
ए टाईप, सेक्टर-१३, नवीन पनवेल, जि.रायगड — अर्जदार

अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील कै. राजाराम भेराजी चौधरी हे दि.१५/०१/२०२२ रोजी यशोनारायण सोसायटी, पनवेल येथे मयत झालेले आहेत. सदरहू मयत कै.राजाराम भेराजी चौधरी यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे व इतर यांचे सहीत नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | मिळकतीचे वर्णन | क्षेत्र |
|---|---|---|
| १ | गाळा नं.०७, तळमजला,विठोबा कॉम्प्लेक्स, गट नं.८/ए/३/ए, पालीदेवद, सुकापूर, ता.पनवेल, जि.रायगड | २१० चौ.फूट कारपेट (२३.४१ चौ.मी.) |

वरील मिळकतीबाबत अर्जदार ह्यांनी वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशा कोणत्याही प्रकारची तक्रार, वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत मुदतीत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. ही नोटीस आज दि.२४ माहे नोव्हेंबर सन २०२२ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# घेरावानंतर मुंबई-गोवा महामार्गावरील खड्डे भरण्याची मिळाली हमी

## माझं पेण समितीचे प्रांताधिकाऱ्यांना घेराव आंदोलन तुर्त स्थगित

**दै.रायगड नगरी । पेण**



मुंबई-गोवा महामार्गावर पडलेले खड्डे येत्या १५ दिवसात पूर्ण भरले जातील असे लेखी पत्र मिळाल्यानंतर माझं पेण समितीने गुरुवारी नियोजित केलेले प्रांताधिकारी कार्यालयातील आंदोलन तुर्तास स्थगित केले आहे. मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सुरु होऊन आज बारा वर्षे झाली तरी देखिल पुर्ण झालेले नाही. पत्रकार संघटना तसेच विविध संघटनांनी यासाठी आंदोलने केली आहेत. काही दिवसांपूर्वीच माझं पेण समितीच्यावतीने महामार्गावर पेण जवळ रास्ता रोको आंदोलन करुन संपूर्ण महामार्ग सुमारे तीन तास बंद ठेवला होता. या आंदोलनावेळी नॅशनल हायवेचे महाव्यवस्थापक यशवंत घोटकर व प्रशासनाने मध्यस्थी करुन तेव्हा पंधरा दिवसांत महामार्गावरील खड्डे भरले जातील असे लेखी आश्वासन दिले होते. मात्र यानंतर एक महिना झाला तरी देखिल अद्यापही महामार्गावरील पेण रेल्वे स्थानक, वाशीनाका, वडखळ सर्व्हिस रस्ता, गडब, खारपाले तसेच तरणखोप, इरवाडी, हमरापूर फाटा पुल, खरोशी फाटा, जिते व इतर ठिकाणचे खड्डे भरलेले नाहीत. त्यामुळे गुरुवारी माझं पेण समितीच्यावतीने प्रांताधिकारी यांना घेराव आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. याची दखल घेऊन प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार यांनी तातडीने आंदोलनकर्त्यांसोबत बैठक घेतली.

यावेळी नॅशनल हायवेचे अधिकारी कोरडे, महामार्ग ठेकेदार राजू पिचिका, माझं पेण समितीचे संयोजक राजेंद्र पाटील, स्वरुप घोसाळकर, दिलिप पाटील, राजन झेमसे, सी.आर.म्हात्रे, प्रदिप वर्तक, हरिष बेकावडे, काशिनाथ म्हात्रे, गणेश तांडेल, काशिनाथ पाटील, जयस्वाल आदींसह समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी नॅशनल हायवेचे कोरडे यांनी येत्या दोन दिवसांत पेण रेल्वे स्थानक, वाशीनाका या परिसरातील खड्डे तातडीने भरले जातील. तसेच येत्या पंधरा दिवसांत महामार्गावरील सर्व खड्डे भरले जातील असे लेखी आश्वासन पुन्हा दिल्याने सध्याचे हे आंदोलन स्थगित करण्यात आले.

दरम्यान यानंतर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे दिल्ली येथील केंद्रीय पथकातील उच्चस्तरीय अधिकारी विक्रांत कोरड, अंशुमली श्रीवास्तव व नॅशनल हायवेचे महाव्यवस्थापक यशवंत घोटकर यांनी माझं पेण समितीच्या शिष्टमंडळा सोबत पेण येथे चर्चा केली.

सदर बैठकीत मुंबई-गोवा महामार्गाची सध्या अत्यंत दुरावस्था झाली असून महामार्गावर पडलेल्या खड्ड्यांमुळे अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. तसेच जनतेला नाहक त्रास होत आहेत याबाबत सांगितले. त्यावर उपस्थित अधिका-यांनी महामार्गावर पडलेले खड्डे भरण्यासाठी ४५ कोटींचे टेंडर लवकरच काढले जाणार आहे. त्यातून सर्वप्रथम सर्व खड्डे भरुन महामार्ग खड्डेमुक्त केला जाईल. त्यानंतर महामार्गाचे क्रॉंक्रिटीकरण केले जाईल असे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

# प्रशासक सुरेखा भणगे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । माथेरान**



माथेरान नगरीच्या उत्तम प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे ( शिंदे) यांचा वाढदिवस नगरपरिषदेच्या कार्यालयात मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी नगरपरिषदेच्या सर्व कर्मचाऱ्यांसह सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी हजेरी लावली होती.

मागील एक वर्षांपासून माथेरान साठी अत्यंत तळमळीने कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या त्याचप्रमाणे हे गाव आ-पलेच समजून स्वतःला कामांमध्ये झोकून देत त्यांनी आपल्या अल्पावधीतल्या काळात नागरिकांना अभिप्रेत असणारी कामे मार्गी लावली आहेत. एक महिला अधिकारी असताना सुध्दा त्यांनी नागरिकांना वेळोवेळी अत्यावश्यक सेवा, लोकांच्या समस्या अडीअडचणी पूर्ण केल्या आहेत त्यामुळेच त्यांच्या वाढसदिवसाच्या वेळी विविध पक्षांच्या असंख्य कार्यकर्त्यांनी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी कार्यालयात गर्दी केली होती. सोशल मीडियावर सुध्दा सुरेखा भणगे यांच्यावर सर्व हितचिंतकांनी शुभेच्छाचा मोठया प्रमाणावर वर्षाव झाला.यावेळी अनेकांनी सुरेखा भणगे यांच्या कामाच्या पध्दतीवर आपल्या छोटेखानी भाषणात स्तुतिसमने उधळली.

माथेरानच्या आजवरच्या इतिहासात पहिल्यांदा एखादया अधिकाऱ्यांना भरभरून प्रेम देणारी मंडळी यावेळी उपस्थित होती. श्रमिक रिक्षा संघटनेचे अध्यक्ष शकील पटेल, ई रिक्षाचे जनक सुनील शिंदे, प्रकाश सुतार, शैलेश चाफेकर, जनार्दन पार्टे, पप्पू गायकवाड, दीपक रांजणे, दीपक डोईफोडे, शिवाजी साळुंखे, भारतीय जनता पक्षाचे राजेश चौधरी, प्रदीप घावरे, चंद्रकांत जाधव, राकेश चौधरी त्याचप्रमाणे नगरपालिका अभियंता स्वागत बिरंबोले, लेखापाल अंकुश इचके, कार्यालय अधीक्षक प्रवीण सुर्वे, राजेश रांजणे, नरेंद्र सावंत, अभिमन्यु येळवंडे, अन्सार महापुळे, ज्ञानेश्वर सदगीर, अजय साळुंखे, प्राजक्ता कदम, स्नेहा साखळकर, नम्रता गोरे, सोनल कदम, अर्चना ढेबे, जयवंत वर्तक, उमेश मोरे, लक्ष्मण दरवडा, रामदास धोत्रे आदी उपस्थित होते.

# ९ डिसेंबर पासून श्रीवर्धन येथे श्री सोमजादेवीचा रथोत्सव

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**



प्रतिवर्षीप्रमाणे श्रीवर्धन येथील श्री सोमजाई देवीचा रथोत्सव मार्गशीर्ष कृ.१ (९ डिसेंबर २२) ते मार्गशीर्ष कृ. ९ (१७ डिसेंबर २२) या कालावधीत भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात येणार आहे.

उत्सवाचा प्रारंभ ९ डिसेंबर रोजी स.८ वा.होईल तर १६ डिसेंबर रोजी पहाटे ५ वा.काकड आरती,दुपारी ११=३० ते ३=३० महाप्रसाद व मध्यरात्री १२ वा. रथ यात्रेला सुरुवात होईल. दि. १७ रोजी दु १२=०० नंतर रथयात्रेचा सांगता सोहळा होईल. हा रथोत्सव सर्वांच्या सहकार्याने दरवर्षी अतिशय भक्तीमय वातावरणात संपन्न होत असतो. रथोत्सवाच्या काळात मंदिरात अखंड भजन सेवा सुरु असते.

अ.रा.गुन्नाल सो

अर्जदारांकरिता अ‍ॅडव्होकेट उदय प्र.मोकल

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१६१३/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.०३/०१/२०२३

(कै.कल्लुंकाल स्कारिया अलेक्सझांडर व
कै.चिन्नम्मा कल्लुंकाल अलेक्सझांडर यांचे कायदेशीर वारस)
(Late Shri.Kallumkal Skariah Alexander's
And Late Ms.Chinnamma Kallumkal
Alexander's Legal heirs)
१) श्री.ग्लॅडी कल्लुंकाल अलेक्सझांडर (मुलगा)
(Mr.Glady Kallumkal Alexander (Son))
वय : ५६ वर्षे, धंदा : नोकरी
रा.ए/१०६, हॉल रोड, मन्सुझा अपार्टमेंट,
कुर्ला (वेस्ट), मुंबई, पिन-४०००७०
२) सौ.लव्हली वर्गीस
(लग्नानंतरचे नाव) उर्फ
लव्हली कल्लुंकाल अलेक्सझांडर
(लग्नाआधीचे नाव (मुलगी))
(Mrs.Lovely Varghese
(nee Lovely Kallumkal Alexander)
(Daughter)
वय : ५९ वर्षे, धंदा : नोकरी
सध्याचा पत्ता : २८६२, वॉलनट हिल्स स्ट्रीट,
पीए, १९१५२, फिलाडेल्फीया, अमेरिका,
कायमचा पत्ता : ए/१०६, हॉल रोड,
मन्सुझा अपार्टमेंट, कुर्ला (वेस्ट)
मुंबई, पिन-४०००७० — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.कल्लुंकाल स्कारिया अलेक्सझांडर, यांचे निधन दि.२६/०३/२००७ रोजी टेंपल युनिव्हर्सीटी हॉस्पिटल, फिलाडेल्फिया, अमेरिका येथे झालेले आहे. तसेच कै.चिन्नम्मा कल्लुंकाल अलेक्सझांडर निधन दि.१६/०४/२०२२ रोजी राहत्या घरी दुबई (यु.ए.ई) येथे झालेले आहे. कै.कल्लुंकाल स्कारिया अलेक्सझांडर व कै.चिन्नम्मा कल्लुंकाल अलेक्सझांडर यांच्या मृत्यू पश्चात वरीलपैकी अर्जदार हे कै.कल्लुंकाल स्कारिया अलेक्सझांडर व कै.चिन्नम्मा कल्लुंकाल अलेक्सझांडर कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांचे म्हणणे असे आहे की, कै.कल्लुंकाल स्कारिया अलेक्सझांडर व कै.चिन्नम्मा कल्लुंकाल अलेक्सझांडर यांनी दि.१४/१०/२०२२ मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालील वर्णनित निवासी सदनिका खरेदी केलेली आहे.

**मालमत्तेचे वर्णन**
**निवासी सदनिका : नवीन पनवेल (पुर्व)**
**गॉडस ग्रेस को.ऑप.हौ.सो.लि.,**
**फ्लॅट नं-१०२ ए, पहिला मजला,**
**ए विंग, प्लॉट नं.१९, सेक्टर १६,**
**नवीन पनवेल (पुर्व), ता.पनवेल, जि.रायगड**
**क्षेत्रफळ : ७१८ स्क्वे.फुट (कारपेट एरिया)**

सदर वरील वर्णनित स्थावर मिळकतीचे वारस दाखला मिळणेकरिता वरील अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर पनवेल यांचे कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही हक्क, अधिकार, हिस्सा असल्यास अथवा अर्जदार यांस वारस दाखला देण्यास हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेचे तारखेपासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून लेखी अथवा तोंडी हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.कोर्टात दाखल करावयाच्या आहेत. वरील प्रमाणे मुदतीमध्ये हरकत दाखल केल्या नाही तर अर्जाचे कामी योग्य ती पुढील पुर्तता करून पुरावा घेवून मे.कोर्टात अर्जदार यांचे नावे वारस दाखला प्रदान करण्यात येईल आणि नंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २३/११/२०२२

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# एका इसमाची ऑनलाईन फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोबाईल मधील फोने पे ऍप वर मिळालेले रिवॉर्ड ची रक्कम मिळवताना तक्रार दाराच्या खात्यातून सदरचे पैसे वजावट झाल्याने ती रक्कम परत मिळवण्याकरिता फोन पे कस्टमर केअर चा इंटरनेट वरून मिळालेला मोबाईल नंबर यावर बोलताना सदर इसमाने रक्कम परत मिळवून देतो असे सांगून विशिष्ट अ‍ॅप्लिकेशन डाऊनलोड करायला सांगितले व त्याच्या बँक खात्यातून जवळपास १ लाख २१ हजार रुपये काढून घेतल्याची घटना काळुंद्रे गावात घडली आहे.

अमित म्हापसेकर हे त्यांच्या मोबाईल मधील फोने पे ऍप वर मिळालेले रिवॉर्ड ची रक्कम मिळवताना तक्रार दाराच्या खात्यातून सदरचे पैसे वजावट झाल्याने ती रक्कम परत मिळवण्याकरिता फोन पे कस्टमर केअर चा इंटरनेट वरून मिळालेला मोबाईल नंबर यावर बोलताना सदर इसमाने रक्कम परत मिळवून देतो असे सांगून विशिष्ट अ‍ॅप्लिकेशन डाऊनलोड करायला सांगितले व त्याच्या बँक खात्यातून जवळपास १ लाख २१ हजार रुपये काढून घेतल्याने आपली ऑनलाईन आर्थिक फसवणूक झाल्याचे लक्षात येताच याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिली आहे.

मा.सोनावणे सो

अ‍ॅड.सुनील एन. मोरे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर/क.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१७००/२०२२

नि.नं.८/ड

ने.ता.१७/०१/२०२३

१) श्रीमती.सखुबाई नारायण मोरे
वय : ६९ वर्षे, व्यवसाय : घरकाम
रा.मु.पो.बिरणवाडी, ता.तासगांव, जि.सांगली
२) श्री.अनिल नारायण मोरे
वय : ४९ वर्षे, व्यवसाय : धंदा
३) श्री.किसन नारायण मोरे
वय : ४२ वर्षे, व्यवसाय : धंदा
अर्जदार नं.२ व ३ रा.के.एल.-१, रुम नं.सी-३,
सेक्टर नं.५ ई, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड
४) श्री.सुनील नारायण मोरे
वय : ४४ वर्षे, व्यवसाय : वकील
रा.फ्लॅट नं.००२, तळमजला, साई अंबर रेसिडेन्सी,
प्लॉट नं.९०, नावडे फेज-२, नावडे कॉलनी,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ हिचे पती व अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील कै.नारायण आंबो मोरे हे दि.१४/०८/२०२२ रोजी मु.पो.बिरणवाडी, ता.तासगांव, जि.सांगली येथे मयत झालेले आहेत. तसेच अर्जदार नं.१ हिची सासू व अर्जदार नं.२ ते ४ यांची आजी कै.आवडाबाई आबा मोरे या दि.११/०३/१९९६ रोजी मु.पो.बिरणवाडी, ता.तासगांव, जि.सांगली येथे मयत झालेले आहेत. कै.नारायण आबा मोरे यांच्या नावाने सिडको कार्यक्षेत्रात खालील वर्णनाची मिळकत सिडकोकडे नोंदीत आहे. सदर मिळकती संदर्भात वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी मे.कोर्टात अर्ज केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथील सिडको हद्दीतील**
**के एल-१, रुम नं.-सी-३,**
**सेक्टर नं.५ ई, कळंबोली,**
**ता.पनवेल, जि.रायगड**

वरील मिळकती संदर्भात अर्जदार यांच्या नावाने वारस दाखला देण्याबाबत कुणाचीही हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास वारस दाखला अर्जदारांच्या नावे प्रदान करण्यात येईल.

आज दि.२४/११/२०२२ रोजी कोर्टाच्या सही शिक्क्याने दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

अ.रा.गुन्नाल सो

अ‍ॅड.दिनानाथ कै.सोनकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज वरिष्ठ स्तर साहेब यांचे कोर्टात

चौ.अर्ज क्र.१४७०/२०२२

नि.नं.७/ड

ने.ता.०३/०१/२०२३

१) श्रीमती.रेणुका सिद्धार्थन उरालत
वय : ६३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) श्री.सीबी सिद्धार्थन उरालत
वय : ४४ वर्षे, व्यवसाय : नोकरी
१ व २ रा.बी ४०३ कल्पवृक्ष को.ऑप.हौ.सो.,
प्लॉट नं.४, सेक्टर ९ कॉर्पोरेशन बँक समोर,
खांदा कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
३) श्री.सीजू सिद्धार्थन उरालत
वय : ४१ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.फ्लॅट नं.३०१, सनफ्लॅश, प्लॉट नं.१४४,
सेक्टर १२, वाशी, नवी मुंबई, पिन नं.४००७०३ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

वरील अर्जदार क्र.१ श्रीमती.रेणुका सिद्धार्थन उरालत, अर्जदार क्र.२ श्री.सीबी सिद्धार्थन उरालत आणि अर्जदार क्र.३) श्री.सीजू सिद्धार्थन उरालत, वरीलप्रमाणे सर्व रा.अर्जदार क्र.१ यांचे पत व अर्जदार क्र.२ आणि ३ यांचे वडील कै.सिधार्धन कोचु उरालथ @ स्व.सिद्धार्थन कोचू उरालत हे दि.२३/११/२०१७ रोजी त्यांच्या राहत्या घरी खांदा कॉलनी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झाले असून त्यांचा अंतिम विधी पनवेल येथे करण्यात आला आहे. सदर मयताच्या नावे असलेली मिळकत खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**सदनिका क्र.४०३, चौथा मजला, बी-विंग, कल्पवृक्ष को.ऑप.हौ. सोसायटी लि., प्लॉट नं.४, सेक्टर ९, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (वेस्ट), तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, पिनकोड-४१०२०६, (क्षेत्रफळ ६६० चौ.फुट कारपेट व ७३.५७ चौ.मी. बिल्टअप एरिया)**
**सदर सदनिकेची एकूण किंमत रक्कम रु.६५,००,०००/-**
**(अक्षरी रुपये पासष्ठ लाख फक्त)**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसांचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क अधिकार, हितसंबंध, अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात दाखल करावी.

वरील हरकत न आल्यास अर्जदारांच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२२/११/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## दोन अनोळखी इसमांनी केली वृद्ध महिलेची फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मोटार सायकल वरून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी एका ६५ वर्षीय वृद्ध महिलेची फसवणूक करून तिच्याकडे असलेली सोन्याची माळ फसवणूक करून काढून घेऊन पसार झाल्याची घटना करंजाडे वसाहती मध्ये घडली आहे.

मालिनी बाबर (वय ६५ रा.करंजाडे) या पायी त्या परिसरातून जात असताना दोन अनोळखी इसम त्यांच्या जवळ आले व त्यांनी तेथील शुक्ला मॅडमचा खून झाला आहे असे खोटे सांगून तुमच्या गळ्यातील सोन्याची माळ काढून ठेवा असे बोलण्यात गुंतवून सदर माळ काढून घेऊन त्यांनतर ते दोघेजण मोटार सायकलवरून पसार झाल्याने आपली फसवणूक झाल्याचे मालिनी बाबर यांना लक्षात असल्याने त्यांनी या बाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली आहे.

## ओम साई पदयात्रा मित्र मंडळा तर्फे पेण ते शिर्डी पायी पदयात्रा

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील ओम साई पदयात्रा मित्र मंडळा तर्फे पेण ते शिर्डी पायी पदयात्रा दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर पदयात्रा पेण मधून रवाना झाली असून २५४ कोलीमोटर चालत जाऊन २८ नोव्हेंबर रोजी श्री साई बाबांच्या भेटीला शिर्डी येथे पोहचणार आहे. या पदयात्रेत २१७ तरुणांनी सहभाग घेतला आहे.

पदयात्रे अगोदर संपूर्ण पेण शहरात साईंची भव्य मिरवणूक काढण्यात आली आहे. या मिरवणुकीत साईबाबाचें चलचित्र, देखावे, वरळी बिट्स बेंजो पथकासह टाळ्यांच्या गजरात भव्यदिव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणूकीत पेण शहरासह ग्रामीण भागातील असंख्य साईभक्त सहभागी झाले होते.

न भुतो न भविष्यती अशी ही मिरवणूक पेण शहरात अनेक वर्षानीं काढण्यात आली होती. या मिरवणुकीत हजारोंनी साई भक्त सहभागी झाले होते. यावेळी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते.

मिरवणुकीच्या दुस-या दिवशी पहाटे ५ वाजता पेणमधील साईमंदिरात बाबांची आरती करुन ही दिंडी पेण-खोपोली रस्त्यावरुन शिर्डीच्या दिशेने रवाना झाली. ओम साई पदयात्रा मंडळाचे यंदाचे हे १४ वे वर्ष आहे. लोणावळा घाट, कामशेत, तळेगाव, चाकण, मंचर, आळेफाटा मार्गे ही पायी पदयात्रा सोमवार २८ नोव्हेंबर रोजी शिर्डी नगरीत दाखल होईल.

त्यानंतर साईबाबाची भेट घेतल्यानंतर सर्व पायी पदयात्री पुन्हा पेणकडे परतीच्या प्रवासाला मार्गस्थ होतील. त्यानंतर गुरुवार १ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता पेणमधील सेंच्युरियन पार्क, चिंचपाडा येथे साईंचा भंडारा आयोजित करण्यात आलं आहे.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहर पोलीस ठाण्यात पोलीस पाटील व सरपंचाची बैठक



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली आज बैठक पार पडली. यावेळी आवश्यक त्या सूचना कादबाने यांनी उपस्थितांना दिल्या.

या बैठकीला वरिष्ठ पोलीस निरिक्षक विजय कादबाने, पोलीस निरीक्षक शिंदे, गुप्त विभागाचे अधिकारी संजय धारेराव आदी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना वपोनि विजय कादबाने यांनी उपस्थितांना सांगितले की, निवडणूक आचारसंहिताच्या नियमाचे उल्लंघन होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी, धार्मिक मतभेद वाढतील किंवा तणाव निर्माण होईल असे कोणतेही काम करू देवू नये, ग्रामपंचायत निवडणुकीच्या अनुषंगाने कोणत्याही बेकायदेशीर घटना घडत असतील तर पोलीस ठाणे येथे तात्काळ माहिती द्यावी, प्रस्तावित सभेसाठी ध्वनीक्षेपणाचा वापर करण्यासाठी आणि अशा इतर कोणत्याही विषयासाठी वरिष्ठांची परवानगी घेणे आवश्यक आहे, निवडणुकीकरिता उभे असलेले उमेदवार यांनी ज्या प्रभागातून निवडणूक लढवणार आहे त्या प्रभागातच प्रचार करावा इतर प्रभागात जाऊन प्रचार करणार नाहीत याबाबत दक्षता घ्यावी, मंदिर, मज्जित, दर्गा, चर्च, गुरुद्वार, किंवा इतर कोणते प्रार्थना स्थळ याचा वापर निवडणूक प्रचाराची भाषणे यांच्यासह निवडणूक प्रचाराची जागा म्हणून वापर केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी, सर्व ग्रामपंचायत यांनी गावांमध्ये सीसीटीव्ही बसवून घ्यावेत याबाबत मार्गदर्शन केले, मतदाराला पैशाचे किंवा अनेक कशाचेही प्रलोभन दाखवत असतील तर तात्काळ पोलीस ठाण्यात माहिती द्यावी, यासारख्या सूचना यावेळी देण्यात आल्या तसेच उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांचे व शंकांचे निरसन करण्यात आले.

## कर्जतमध्ये वाहनांवर वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांची कारवाई

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत मध्ये वाहनांवर वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यांची कडक कारवाई मोहीम सुरू केली आहे, त्यामुळे वाहन चालकांनी नियम पाळून वाहन चालवावे नाही तर आपल्यावरही होऊ शकते दंडात्मक कारवाई

वाहनांवर नंबर प्लेट नसणे, लायन्सस नसणे आदी अश्या वाहन चालकांनी सावधान आपल्याला दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल, कर्जत मध्ये शाळेमध्ये येताना अनेक विद्यार्थी बाईक घेवून येतात अनेकांच्या गाड्यावर नंबर प्लेट नाहीत, काही विद्यार्थींचे वय १८ वर्ष पूर्ण नाही, काहीजण उगाचच शाळेसमोरील रस्त्यावर बाईकवर फे-या मारत असतात, तर काही विद्यार्थी शाळे समोरील परिसरात गप्पा मारत उभे असतात त्यामध्ये मुलींचा समावेश असतो अश्या विद्यार्थ्यांवर वचक राहण्यासाठी कर्जत मध्ये शाळेच्या वेळेत वाहतूक कर्मचारी उभे राहून वाहन चालकांवर कारवाई करत आहेत. वाहतूक सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक मुकुंद दरेकर, वाहतूक महिला पोलीस कर्मचारी मनाली सोनावणे आणि गणेश बोराडे यांनी आज दि.२४ नोव्हेंबर दुपार पर्यत १२ जणांवर दंडात्मक कारवाई करून ६ हजार रुपयांची भर शासनाच्या तिजोरीत केली आहे.



## आंबेवाडी नाक्यावर पिसाळलेल्या कुत्र्याची दशहत ; दोन व्यक्तींना घेतला चावा

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

आंबेवाडी नाक्यावर पिसाळलेल्या कुत्र्याने दोन व्यक्तीचा चावा घेतला असून हा कुत्रा अनेकांच्या अंगावर धावत जात आहे यामुळे या कुत्र्यामुळे आंबेवाडी नाक्यावर दशहत निर्माण झाली असून संबंधितांकडून याचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

आंबेवाडी नाका हे मुंबई-गोवा हायवे वरील बाजारपेठेचे मध्यस्ती ठिकाण असून येथे असंख्य नागरिक येजा करीत असतात तसेच या परिसरात शाळा कॉलेज असल्यामुळे असंख्य शालेय विद्यार्थी येजा करीत असतात यामुळे येथे मोठया प्रमाणात नागरिकांची वर्दळ सुरु असते. येथे दोन दिवसापासून पिसाळलेल्या कुत्र्याची दशहत सुरु असून काल या कुत्र्याने एका महिलेवर हल्ला करून रक्त बंबाल केले.यामुळे या परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

दिवसेंदिवस बाजारपेठेत असंख्य कुत्र्यांचा संचार सुरु या कुत्र्यांच्या झुंडीच्या झुंडी रस्त्यातून जात असतात यामुळे वाहन चालकांच्या जिवलाही धोका निर्माण झाला आहे. दोन दिवसापूर्वी कुत्रा आडवा आल्यामुळे टूव्हीलर स्वार खाली कोसळला सुदैवाने तो थोडक्यात बचावला असून यामुळे या विषयी संबंधितांनी याकडे लक्ष देऊन उपाययोजना करावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## ऐतिहासिक स्थळांचा, स्मारकांचा वारसा टिकविण्याची जबाबदारी सर्वांची : अमोल यादव

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

आपल्या जिल्ह्यात विविध ऐतिहासिक वारसा असलेली स्मारके, विविध स्थळे आहेत. या ऐतिहासिक स्थळांचा, स्मारकांचा वारसा टिकविण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची असल्याचे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी अमोल यादव यांनी नुकतेच घारापूरी-एलिफंटा येथे केले.

जागतिक वारसा सप्ताहाच्या निमित्ताने भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या माध्यमातून दि.१९ ते दि.२५ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून नुकतेच एलिफंटा लेणी (जागतिक वारसा स्थळ), घारापुरी येथे या सप्ताहाच्या उद्घाटनपर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी अधीक्षक पुरातत्वशास्त्रज्ञ, मुंबई सर्कल डॉ.राजेंद्र यादव, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) तथा प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के-पाटील, सेंट झेव्हियर्स महाविद्यालयाच्या प्रा.डॉ.अनिता राणे-कोठारे, पनवेल उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके, उरण तहसिलदार भाऊसाहेब अंधारे, एलिफंटाचे सरपंच बळीराम ठाकूर, माजी सरपंच राजेंद्र पडते यांची प्रमुख उपस्थिती होती.

अपर जिल्हाधिकारी अमोल यादव पुढे म्हणाले की, दि.१९ ते २५ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत आयोजित या जागतिक वारसा सप्ताहा चा उद्देश प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या आपल्या वारसांचे जतन करणे हा आहे. रायगड किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक, महाड तालुक्यातील चवदार तळे येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक, घारापुरी येथील शैवलेणी-एलिफंटा लेणी यासारख्या इतर अनमोल अशा ऐतिहासिक स्थळांचा, स्मारकांचा वारसा टिकविण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. यासाठी सर्व ऐतिहासिक स्मारकांच्या, स्थळांच्या ठिकाणी स्वच्छता राखणे, प्लास्टिकचा वापर टाळणे, तेथे कोणत्याही प्रकारची विद्रूपता न करणे, तेथील पावित्र्य राखणे, हे सर्वांचेच कर्तव्य आहे. या कर्तव्याप्रति कटिबद्ध होवू या.

घारापूरी लेणी या विषयावरील पी.एच.डी संपादन केलेल्या सेंट झेव्हियर्स महाविद्यालयाच्या प्रा.डॉ.अनिता राणे-कोठारे एलिफंटा केव्ज - न आर्किटेक्चरल मार्व्हल या विषयावरील माहिती देताना म्हणाल्या की, मुंबई शहर हे सात बेटे आणि ६६ द्वीप यांनी मिळून बनले आहे. भारतातील दोन तृतीयांश लेण्या सह्याद्री पर्वतरांगांमध्ये आहेत. वारा-पावसापासून सुरक्षित राहण्यासाठी प्राचीन काळापासून भिक्षू या लेण्यांचा आसरा घेत असत. एलिफंटा लेणी ज्वालामुखीच्या उद्रेकापासून तयार झाली आहे.

एलिफंटाचे सरपंच बळीराम ठाकूर यांनी आपल्या मनोगतात भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागासोबत करीत असलेल्या कामाबद्दल माहिती दिली. तर एलिफंटाचे माजी सरपंच राजेंद्र पडते यांनी एलिफंटा लेणीबद्दलचे आपल्या जुन्या अनुभवांचे कथन केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस अधीक्षक पुरातत्व शास्त्रज्ञ, मुंबई सर्कल डॉ.राजेंद्र यादव प्रास्ताविकात म्हणाले की, घारापूरी येथील जगप्रसिद्ध एलिफंटा लेणी जागतिक वारसा स्थळ म्हणून सर्वांना परिचित आहे. आपल्या पूर्वजांनी यासाठी मोठे योगदान दिले आहे. जवळपास २ हजार वर्षांपासून आयकॉनिक व सार्वत्रिक मूल्य असलेले हे स्थळ जगात एकमेव असून दुसरी एलिफंटा लेणी होणे शक्य नाही.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. शेवटी या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ए.एस.ए. डॉ. नागणूर यांनी केले.

## अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा; मुंबई विभागाच्या प्राथमिक फेरीला सुरुवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मानाच्या 'अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका' स्पर्धेतील मुंबई विभागाच्या प्राथमिक फेरीला आज (दि. २४) खांदा कॉलनी मधील सीकेटी महाविद्यालयाच्या सभागृहात संपन्न झाले.



यावेळी दिग्दर्शक, अभिनेते व लेखक दीपक पवार, लेखक व अभिनेते राहुल वैद्य अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे खजिनदार अमोल खेर, सांस्कृतिक सेलचे रायगड जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, सहसंयोजक गणेश जगताप, चिन्मय समेळ, ओंकार सोष्टे, तसेच सिकेटी महाविद्यालय व टीम अटल करंडक चे सदस्य व कलावंत उपस्थित होते. दिनांक २४ ते २७ नोव्हेंबर या चार दिवसांमध्ये ४५ संघ आपल्या एकांकिका सादर करून अंतिम फेरीमध्ये सामील होण्यासाठी प्रयत्न करणार आहेत.

नाटय चळवळ वद्धींगत करण्यासाठी व नाटय रसिकांना आपले नाटयाविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वद्धींगत व्हावा, यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृहनेते व नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी 'अटल करंडक एकांकीका' या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे देखणे व निटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परिक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे ही स्पर्धा नाट्य रसिकांच्या गळयातील ताईत बनली. दरवर्षी या स्पर्धेला राज्यातील कलाकार आणि प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभत असतो. त्यामुळे हि स्पर्धा राज्यात नावाजली असून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांना यंदाही भरघोस रक्कमेची पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या स्पर्धेचे प्रायोजक ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लिमिटेड तर सहप्रायोजक नील ग्रुप आहे.

सिडको शहरांचे शिल्पकार

**जाहीर सूचना**

**(हक्कसोड पत्राबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **हक्कसोडपत्राची जाहीर सूचना.**

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तींची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तींची नावे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | तळोजा १०७८ | पेंधर १/२००८ | २५४/३ अ+३ब +४/१ | ०-२५-५ | २०० चौ.मी. | भूखंड क्र. ९A, सेक्टर-९, क्षेत्र २०० चौ.मी. | १) श्री. शिवराम विठु पाटील<br>**२) कै. काना विठु पाटील (मयत) तर्फे कायदेशीर वारस**<br>२.१) श्री. भालचंद्र काना पाटील<br>२.२) कानुबाई कान्हा पाटील<br>२.३) श्री. दिपक कान्हा पाटील<br>२.४) श्रीमती जयश्री कैलास गोंधळी<br>२.५) श्रीमती सविता लक्ष्मण म्हात्रे<br>३) श्रीमती ताराबाई पुंडलिक म्हात्रे<br>४) श्रीमती सिताबाई उर्फ पार्वतीबाई शालिक पाटील<br>**५) कै. विठु अर्जुन पाटील (मयत) तर्फे कायदेशीर वारस कै. शामा विठु पाटील तर्फे कायदेशीर वारस**<br>५.१) श्रीमती विठाबाई राजाराम पाटील<br>५.२) श्रीमती शैला नरेंद्र गावंड<br>५.३) श्रीमती रमाबाई शामा पाटील<br>५.४) श्रीमती प्रभावती धर्मराज घरत<br>५.५) श्रीमती कल्पना धनाजी काथारा<br>**दुसरे पक्षीय हक्कसोडपत्र लिहून देणारे** | सह. दुय्यम निबंधक, पनवेल-५, दस्त क्र. १७८३०/२०२२, दि. ०७.११.२०२२ रोजीचे हक्कसोडपत्र प्रमाणे<br>**१) श्री. ज्ञानेश्वर शामा पाटील**<br>**२) श्री. भोलेनाथ शामा पाटील**<br>**३) श्री. अशोक शामा पाटील**<br>**४) सौ. आशा बळीराम म्हात्रे**<br>**५) सौ. उषा मधुकर म्हात्रे**<br>**६) सौ. शोभा घनश्याम घरत**<br>यांना हक्क व हितसंबंध प्रदान केलेले आहेत. |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून करारनामा/वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण:- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळमजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/३३९/२०२२-२३